प्रकरण ५वे

'झावळं' आणि 'पखाल' कादंबरीचे भाषाविशेष

प्रकरण ५ वे: 'झावळं' आणि 'पखाल'

कादंबरीचे भाषाविशेष

अ.क्र.	घटक व उपघटक	पृष्ठ
१	प्रास्ताविक	१२१
२	या कादंबऱ्यातील शब्द, वाक्य व परिच्छेदाची रचना	१२१
३	या कादंबऱ्यातील प्रतिमा, उपमा, आणि म्हणी-वाक्यप्रचार	१२६
४	या कादंबऱ्यातील कवितेचा वापर	१३०
५	माणदेशी आणि वऱ्हाडी प्रांतातील ग्रामीण बोलीभाषा	१३२
६	या कादंबऱ्यांचे भाषाविशेष	१३६
७	समारोप	१३८
८	संदर्भ ग्रंथ सूची	१३९

प्रकरण ५वे: 'झावळं' व 'पखाल' कादंबरीचे भाषाविशेष

१. प्रास्ताविक

उत्तम तुपेंच्या 'झावळं' या कादंबरीत 'माणदेश परिसर' येतो तर मुसळेंच्या 'पखाल' मध्ये 'वऱ्हाड प्रांत' येतो. आतापर्यंतच्या आढाव्यामध्ये या दोन्ही विभिन्न प्रांतातील ग्रामीण कोळी समाजातील परंपरागत व्यवसाय,जातपंचायत,राहणीमान,देवधर्म,धार्मिक श्रध्दा व लोककथा या आदी बाबींचा दोन कादंबरीच्या अनुषंगाने विचार केला.या प्रकरणामध्ये माणदेशी आणि वऱ्हाडी बोलीभाषा स्वरूपाचा वैशिष्ट्यांसह अभ्यास करणे हा प्रमुख हेतू असल्याने त्याचा विचार करताना या दोन्ही कादंबऱ्यामधील शब्द,वाक्य व परिच्छेदाची रचना,प्रतिमा,उपमा आणि म्हणी-वाक्यप्रचाराचा वापर,कवितेचा वापर,वऱ्हाडी बाणि माणदेशी ग्रामीण बोली आणि या कादंबऱ्यांचे भाषाविशेष या बाबतीतची चर्चा भाषाशास्त्राच्या अनुषंगाने करण्यात येणार आहे.

२. कादंबऱ्यातील शब्द,वाक्य व परिच्छेदाची रचना

कादंबरी हा खूप मोठा भाषिक आवाका असलेला गद्य वाङ्:मय प्रकार आहे. भाषेला कादंबरीत महत्त्वाचे स्थान असते. ही भाषा शब्द,वाक्य व परिच्छेदाच्या रचनेतून सिद्ध होत असल्यामुळेच आपणाला कलाकृतीचा एकात्म अनुभव घेता येतो. शब्द,वाक्य व परिच्छेद हे लेखक कधी स्वत:च्या निवेदनातून तर कधी प्रमुख आणि गौण पात्रांच्या संवादातून व्यक्त होत असतात.यामुळे कादंबरीच्या भाषेला वैभव प्राप्त होत असते.यासंबंधी भालचंद्र नेमाडे लिहितात की,"संहिता लिखित स्वरूपात प्राय: असल्यामुळे अक्षरांची मांडणी,ओळी

किंवा वाक्यांची मांडणी, शब्दाची लांबी,विरामचिन्हाची व्यवस्था जी एकूण नादतत्त्वाला तोलून धरणारी असते,संहिता छापण्याची शैली,परिच्छदाची पध्दत,एकूण नादतत्त्वाला तोलून धरणारी असते. एकूण संहितेची विभागणी,ह्या बाबीचाही अभ्यास आशयाला उठाव देणारा म्हणून करता येतो."[१] 'झावळं'आणि 'पखाल 'या कादंबऱ्यातूनही प्रस्तुत लेखकांनी शब्द,वाक्य व परिच्छेदाची समर्पकपणे योजना केल्यामुळे कादंबरीतील आशय अधिक समृद्ध झाला आहे.

'झावळं'कादंबरीचे कथानक हे माणदेश प्रांतामध्ये घडलेले असून यामधून मासेमारी करणाऱ्या एका कोळी उपेक्षित जमातीचे चित्रण करण्यात आलेले आहे. कादंबरीतील काशिनाथ,त्यांची पत्नी सोनी,सुब्या,हरिनारायण ह्या प्रमुख पात्रासोबत इतर गौण पात्रांच्या संवादामधून कोळी जमातीतील माणदेशी बोलीभाषेतील संवाद व्यक्त होतात.

या कादंबरीत बरेचसे शब्द 'मासेमारी व्यवसाय'या संबंधित येतात.झावळं,पागिरं,कामठी,हारा,डाग,डोण, चिलीम,दावण, गावकी,जाळं,गळ,पाणपाखरं भोपळ्याचा, पेठा ,वावऱ्या, यासारख्या शब्दांनी 'उसण्यापासण्यानं तर आई मेल्यागत झाली हुती,', (पृ.३३) 'नदीनं तीळगूळ वाटल्यागत काशिनाथ गोड मुखात हासत हुता,',(पृ.११६) 'जिवाला जीव देणारी नदी कैदाशीण होऊन जीव घियाला उठली होती,' ,(पृ.११६) 'पिकलेले शिवार उन्हात चमकावं तसं झावळ्याखाली काशिनाथचं पिक चमकतं हुतं,',(पृ१२६) 'माझा मळा देवानं नव्हं ह्या सरकारनं जाळला' माझी पिक,माझं चंदेरी धन पार बुडलं माझी आई मारूण टाकली. ह्या सरकारनं मला पोरकं केलं, आता माझं सुखदु:ख कुणाला सांगायचं?",(१२८)अशासारख्या वाक्यांनी तसेच 'ही जाळी धड्धाकट तर आपला परपंच धडधाकट,',(११३) 'ए रत्ताड्या,नीट बोल,न्हायतर पायताणानं थोबाड सोलीन मासा सोलल्यागत.',(पृ.१५) "खजाळे,धंद्याच्या गोष्टी मला सांगतीस काय ?" हू मागं न्हायतर थोबाड

फोडीन!,"(पृ.१६) 'सुब्या ,बेन्या,तू कोळ्याच्या पोटी उगाच जलम घिटला'! (पृ.२१) 'खजाळे, तुझं डोळं हायेत, का भिताडं',(पृ.२४) 'पायताणानं माराय पायजे आसला सासरा',(पृ.३७) 'जाऊ,दे काय? ह्या इळ्यानं मासा खाडल्यागत 'खांडीन! मग कुणी बाजीराव असू दे,, (पृ.४१) 'बायला! गोंदावल्याच्या कोळ्यांनी दावणीला काम दावलं वाटत',(पृ.५७) 'बहादरा, मला टांग लावाय तुला दुसरा जलम' घ्यावा लागलं", (पृ.५७)'बेन्या काश्या तवर आमची ही तोंड मुत पिल्यागत हुतेली!",(पृ.६८) 'ए,कुशाबा, नीट बोल, थोबाड फिरवीन एका बुक्कीत, (पृ.७२),' 'लबाडांनू,आता आलाय तोंड दावाय?" ,(पृ.७५), 'आयला तूझ्या आमची ही किंमत केली काय?, (पृ.७६) 'बरं,तुझ्या समिंदर तिकडं गेला कुंच खातं!', (पृ.७६) 'किर्डीवाला'(पृ.७६), 'नाईक, तू मासंचोरां' रांडच्या ये म्होर, (७७) 'हाण हाण त्या बोकडाला,'ए गाव भवाने! 'रेड्या,भवानी आसलं तुझी आय, भन, लई रूबाब दावू नगंस सरपंचा! खाली हात ,घालून घड तोडीन मासा
तोडल्यागत ह्या इळ्यानं!",(पृ.७७) 'काशिनाथ,तुला बघून कुणी खोकला तरं त्याचे नरडं फोडू,' (७८) 'देऊ का कानफाडात ?' तुझ्या बानं पागिरं जोतलं हुतं काय? (पृ.८१), 'बायला,ह्या कोळ्यांनी कायतरी भानगड केलेली दिसती. हातात काठ्या बी हायत्या ' (पृ-८५) यासारख्या शिव्या आणि संघर्षात्मक वाक्यांनी कोळी समाजजीवन हे चांगल्या पद्धतीने चित्रीत झालेले आहे. यामुळे कादंबरीची भाषा ही आशयघन होऊन कादंबरीच्या कथानकात रजंकता आलेली आहे.

याशिवाय कादंबरीच्या निवेदनाची भाषा ही प्रत्येक परिच्छेदातून कथानकाला गती देण्यासाठी महत्त्वाची ठरत आहे. रंगनाथ पठारे यासंबंधी म्हणतात ,"निवेदनाचा एक दृष्टीकोन असतो. आशयाची एक मागणी असते या दोन्हीच्या मिलाफातून निवेदन त्याची शैली वगैरे ठरते.लेखकाला म्हणून जाणीवपूर्वक त्यासाठी काहिही करावे लागत नाही"[२]

"निळ्या मखमालीवर रांगत चाललेला काशिनाथ राजपूत्रासाबखा दिसत होता, अन् खाली नदीच्या पोटातलं धन सोन्याचांदीच्या जित्या ऐवजाचा शोध घेत अल्याडच्या तटाकडं निघाला हुता, बारक्या पोरानं आईच्या अंगाखांद्यावर खेळावं तसं नदीच्या निळ्या पाण्यावर खेळत हुता.·खरं आईचं त्याची पाण्याच्या रूपाने त्यांना जीव लावत होती आपल्या लेकरांकडे बघत हुती नि तळहातात फोड फुटल्यागत जपत होती ती नदीमाय" (पृ.१२)

"झोकात तुळशीची लग्न लागली नि लग्नाचं कळसवणी पडल्याबरोबर नवऱ्या मुलीचं रंगरूप पालटावं, तसं शेतातल्या पिकाचं रुप पालटलं हुतं. मातीखालच्या उबीत वाढलेली पिकं डोर धरून वाढीला लागली हुती. शेताचं मालक, पिकं भांगलून कोळवून पिकातलं तण काढत हुता. तसं काशिनाथबी रोज दुपारचे नदीवर पागिरं, पाड्याची वावरी घेऊन जात हुता"(१०५)

"करजांडाच्या ढवात गुदस्ता पाच पाच किल्लोच्या मरळी मारल्या. त्याचं रूपय बापाच्या आजारपणात उपेगी पडलं, तवा बापाचं आयुक्ष चार महिन्यांनी वाढलं मरणाचा बाप मेला, चार महिनं ह्या ढवानं जगवलं खरं,काठीण वक्ताला करंजढवानं कैकवेळा काशिनाथच्या" घराला असा आधार दिला हुता. आईची माया नि बापाच्या आधारासारखा करंजडोह काशिनाथला वाटत हुता त्या आईच्या पदराखाली बसल्यागत काशिनाथ कवा कवा करजांच्या सावलीत तासन्तास बसून ढवाच्या पाण्यात डोळं घालत हुता" ,(पृ.१०७)

यासारख्या निवेदनांनी

"ए कुणाला,काय बोलू नुको, कुणाची भांडण आणू नुको,न्हायनर तू बी चल माझ्यासंग इक्रीला" ,(पृ.२)

"सोना,इतकं मनाला लावून घिवू नुको, हजारदा मरूण जितं हुणाऱ्या हाराळीगत आपला जलम हाय ह्यो एक अपघात त्यानं आसं खचायचं न्हाय चल, पुन्हीदा उभारी धर",(पृ.२७)

"लोक हो ,तुमस्नी काय, देवधरम हाय का न्हाई ? कुणच्या येळेल काय करावं ह्याचं ध्यान करा,"(पृ.४३)

"आय, नदीमाय, आसचं ह्या लेकराला सांभाळ, बरकत दे, धंद्या पाण्याला कुठं तरी आसाच तुझ्या पदराच्या कोपऱ्याखाली चालता शेर-पाणी मिळू दे, पोट भरू दे, गरीब लेकराला",(पृ.७०)

"ह्या पाखरासारखं ! काशिनाथ ! पाखरासारखं जगायला शिका",(पृ.१२८)

अशासारख्या संवादातून माणसांतील, आपआपसांतील प्रेम व्यक्त होते.

'झावळं' या कादंबरीप्रमाणे 'पखाल' कादंबरीतही शब्द,वाक्य.परिच्छेदातील संवाद आणि निवेदनाने कादंबरीला समृद्ध केलेले आहे. यामध्ये वऱ्हाडी बोलीभाषा येते. पखाल.हाल्या,बलुतं,भारा,चऱ्हाट,नळयोजना,हापरऱ्या,डोह,

पोहरा, इ. शब्दांनी'आली मुत्तामारी नळयोजना काय कपाळाचं कातड नेणार हाये ती आम्हाच्या',(पृ.१०)"थांब,तुले दावतोस',(पृ.२२) बलुत्यांच्या मुत्ताच्या भाकरी खाऊखाऊ माजला चोदीचा' ,(पृ.२२)'नाही ह्याले एकदा हिसका दाखवूच द्या',(पृ.२३)'गिरीजाला दोन गोष्टी करता आल्या नाहीत जन्मात एक छिनाली व दुसरी चोरी ,(पृ.३१)' 'आज जर तुवा 'पखाल दिली नाही तर तू या गावावर कसा राहतसं तेच मी पाहतो",(पृ.३८) ,'ही नळयोजना आपल्यामागं एखाद्या कैदाशिनीसारखी लागली' ,

(पृ.४०) 'आयते खाऊ घालायेले मी काही लालेवरच्या पोटचा, नाही,"होय,तुझ्या मायची डोबडं"ए,भोसडीच्या बैल अंगावर येयाला ले',(पृ.४६) ' मायमोडीन तेच केलं व्हतं , पोरगी कशी माघं राहिल,' ' पखालीची रांडवबाई नळयोजना ' ,(पृ.१५१)

' तुझ्यात इतकी हिंमत असेल तर चल माझ्या संग, धर त्या गावात नळयोजना आणणाऱ्या सरपंचाच मनगट, अन् घाल त्याच्या डकुऱ्यात फाडी ',(पृ.१५१) ' चाल्ला मशीले ताप अन् पखालीले इंजेक्शन द्यायले ', '

तुझ्यात ताकत असेल तर पाड ती पाण्याची टाकी, बुजव ती विहीर, टाक उपटून भुईत पुरलेले नळ',(पृ.१४१) ' अशासारख्या शिव्या आणि संघर्षात्मक वाक्यातून

> " हापशा पाडणारी मशीन जणू त्याच्या काळजाला भोकं पाडत होती "(पृ. १) "
>
> " आजच्या जमान्यात पैसा दिल्याशिवायल लेकरूही बापाला बाप म्हणत नाही. "(पृ.४)
>
> "पखाल वाहणाऱ्या म्हशीला जसा कधीच विचार करण्याची गरज पडली नाही तीच गत पुंजाची झाली",
>
> (पृ.११)

यासारख्या निवेदनात्मक व संवादात्मक वाक्यांनी कादंबरी वाचकांना तगवून धरते. याबाबत रूचिरा भाटकर लिहीतात, " सर्व प्रसंगाचं लेखकाने ग्रामीण भाषेत वर्णन केलेलं आहे. ती भाषा कादंबरी वाचत असताना कोठेच रसभंग करीत नाही उलट एकूणच कादंबरीच अनुभवविश्व व्यापक बनविते. " [३]

अशाप्रकारे ' झावळं ' आणि ' पखाल ' या कादंबरीतून प्रमुख व गौण पात्रांच्या तोंडून, निवेदनातून, संवादातून कोळी समाजजीवन वऱ्हाडी व माणदेशी बोलीतून व्यक्त झालेले आहेत. शब्द, वाक्य, परिच्छेद हे कादंबरीच्या भाषेच्या दृष्ठीने महत्त्वाचे आहेत. त्यामुळे कादंबरीला वेगळेपणा झालेला आहे.

३. या कादंबरीतील उपमा, प्रतिमा आणि म्हणी–वाक्यप्रचार

कोणत्याही कलाकृतीची वाङ्‌मयीन चिकित्सा करित असताना भाषाविशेषाच्या विचाराला महत्त्वाचे स्थान देणे आवश्यक ठरत असते.यामध्ये शब्द व परिच्छेदाच्या रचनेप्रमाणे उपमा, प्रतिमा, म्हणी व

वाक्यप्रचारांच्या योजनेलाही तेवढेच स्थान असते. या भाषिक योजनेबाबत भालचंद्र नेमाडे आपले मत नोंदवतात," वाच्यार्थ,सूचितार्थ आणि संहितार्थ ही तीन कार्ये साहित्याच्या भाषेत कमी- जास्त प्रमाणात आढळली, तरी अर्थाचे अधिक वक्र व्यापार, अधिक उठाव आणि व्यामिश्रता अधिक स्पष्टीकरण करणारे भाषिक प्रयोग,रूपक,प्रतिक,प्रतिमा आणि प्राक्कथा यांच्या योजनेने शक्य होतात. या चारही भाषिक योजना भाषेच्या अंत:स्तरावर उगम पावणाऱ्या विविध अर्थछटांचे संलग्नीकरण करताना दिसतात."[४] 'झावळं ' आणि ' पखाल ' या कादंबऱ्याच्या भाषाविशेषाचा विचार करताना. प्रस्तुत लेखकांनी उपमा प्रतिमांचा कादंबरीत कसा वापर केला. या विषयीचे विवेचन करणे मला महत्त्वाचे वाटते.

' झावळं ' या कादंबरीत उत्तम बंडू तुपे यांनी उपमा,प्रतिमांचा केलेला वापर याप्रमाणे.

"पागिराच्या सूताची खालची पसरण तरण्या पोरीच्या परकरागत झोकबाज दिसत हुती.", (पृ. १)

" काशिनाथच्या हातातून उगवल्यालं पागिरं त्याच्या हातावर बाळागत खेळताना काशिनाथला खुशी हुयाची, आपल्या बाळाचं नाकं,तोंडं,पुसून काढल्यागत काशिनाथ पागिऱ्यात गुतल्यालं नखा-बोटांनी काढता काढता पागिऱ्याच्या सुताची घरं जीव सोडवल्यागत सोडत हुता. पागिऱ्यात गुतल्याला मासा धडपडावां तशी त्याचीच सावली पागिऱ्यात धडपडत हुती. त्याच्या सावलीच्या शिराच्या वरच्या बाजूचं पागिरं वीतभर फाटल्याला बघून काशिनाथच्या जिवाची नुसती तगमग झाली", (पृ.१)

"झिंग्याची पाटी त्याच्यावर उपटी केली न मोती-चुरावरनं हात फि फिरवल्यागत झिंग्यावरनं हात फिरवला. एक एक सुटा झालेला झिंगा उन्हाच्या तिरपानं झगमागायला लागला जणू चांदीच्या तारा भुईतून वर आल्यात",(पृ.२)

"बारक्या पोरानं आईच्या अंगाखांद्यावर खेळावं, तसा नदीच्या निळ्या पाण्यावर खेळत हुता. खर आईचं त्याची पाण्याच्या रूपाने त्याला जिव लावत हुती. आपल्या लेकराकडं बघितल्यागत हजार डोळ्यांनी काशिनाथकडं बघत हुती.नि तळहातात फोड फुटल्यागत जपत होती ती नदीमाय.",(पृ.९२)

"शेताचं मालक पिकं भांगलून,कोळपून पिकातलं तण काढत हुता तसचं काशिनाथ बी रोज दुपारचे नदीवर पागिरं,कपड्याची वावरी घेऊन जात हुता",(पृ.१०५)

"पिकात शिरलेलं ढोर झोडपावं तसा काठीनं झोडपून बेडकांचा जिव घेत हुता नि आपल्यालाच बोलत हुता", (पृ.१०६)

"बिरूला सांगून काशिनाथ आईला भेटायला निघाल्यागत करंजढवाकडं निघाला. एका दोन घूमत ढवावर आला जवळ आलेल्या लेकराच्या अंगावरनं आईनं हात फिरवल्यागत ढवाच्या पाण्यावरचा गारवा काशिनाथाच्या अंगावरून फिरून गेला नि काशिनाथला बळ आल्यागत झालं", (पृ.१०७)

"मनाजोगा पाऊस पडला हुता. नदीला पानलोट येऊन गेला हुता. नदीनं तिळगुळ वाटल्यागत नदी,'बाळा! झाले तुझ्या मनाजोगं? लई राग धरला हुतासा माझ्यावर! आतनं आतनं नदीचं बोलल्यागत वाटलं नि सपई पाण्यावर बारक्या रेघा काढत वाऱ्याची एक झुळूक निघून गेली", (पृ.११६)

"तेलात भजी सोडल्यागत मातीचं गोळं झावळ्यात सोडत हुता", (पृ.११८)

"जावाय पावणा रूसून गेल्यागत त्याचा रूसवा काढायंपुरतं मासं त्याच्या पदरात घालून त्यालाबी झावळ्यातल्या माशागत गुंतवून ठेवत हुता", (पृ.११८)

"पिकलेलं शिवार उन्हात चमकावं, तसं झावळ्याखाली तुला ह्या काशिनाथचं पिकं चमकत हुतं",(पृ.१२६)

'पखाल' या कादंबरीत बाबाराव मुसळे यांनी वापरलेली प्रतिके व उपमा पुढीलप्रमाणे-

"नळयोजना ही जणू कैदाशिणीसारखी आली.",(पृ.४०)

"पुरानातल्या राक्षसासारखा आपण आपला प्रचंड हात बसल्या जागेवरून लांबवावा अन् गावाकडं चाललेली ठेकेदाराची जीप हाताच्या मुठीत धरून आतल्या ठेकेदारासह नि चेंदामेंदा करावा पाण्याचा टाकीही."

"कुत्र्याला फेकावा तुकडा तसा पखालीवाल्याकडे फेकला जातो."

"त्या कथेतल्या शिकाऱ्याच्या जाळ्यात अडकलेल्या सिंहासारखी आपली गत झाली."(पृ.१३३)

"पुंजांची गत उंकडे फुकायला सोडलेल्या गाढवासारखी झाली ."(पृ.१४७)

'ह्यो बाप हाये का खाटक हाये."

अशासारख्या प्रतिमा,उपमाचा वापर केल्यामुळे पात्रांच्या व्यक्तिमत्त्वात एक उठावदारपणा प्राप्त झालेला दिसून येतो. यांच्या वापरामुळे आशयाला बाधा न येता उलटपक्षी कादंबरीच्या कथानकाचा आशय समृद्ध होण्यास मदत झालेली आहे.याचबरोबर यादोन्ही कादंबऱ्यातून अनेक ठिकाणी म्हणी - वाक्यप्रचारांचा व सुभाषितांचा वापर सूचकपणे केल्यामुळे थोड्या शब्दात व्यापक अर्थ सांगण्यास प्रस्तुत लेखकांना यश आलेले आहे. 'झावळं' या कादंबरीत म्हणी -वाक्यप्रचार व सुभाषितांचा वापर याप्रमाणे आढळतो.'मूठ मारून आतडी गोळा होणे,',(पृ.९०) 'झावळं कमावणे',(प.११५) 'जिवाला जीव देणे',(पृ.११६) 'झावळं टाकणे,' 'झावळं पोटात घालने',(पृ.११९) 'पोरकं होणे,'(१२८) 'काळीज कापणे',(पृ.१२८) 'येळ आला हुता पर काळ नव्हता',(पृ.९६)'जीव नखात आणणे,''तळपायाची आग होणे,'या 'झावळं' कादंबरीप्रमाणेच 'पखाल' या कादंबरीमधून ही वाक्यप्रचार-म्हणी व सुभाषितांचा वापर केलेला

आढळतो तो याप्रमाणे, 'हुतु हुतु कुठं मुतूं','कुणबी जैसा दाता नही,' मगर मारे बिना देता नही, ' तुझं माझं जमेना, तुझ्याबिगर करमेना ', ' इडा पिडा टळो, बळीचं राज्य येवो ', ' इकडे आड तिकडे विहिर ', ' दूधात मिठाचा खडा टाकणे ', ' संसाराचे ठिगळ शिवणे ', ' लेक उभारली गुढी, सुनंचं गुऱ्हाळ लोकापुढी ', '....च्यासाठी हावरी होऊ की डवरी होऊ ', ' सोयरिक-धायरिक करणे ',' समेट घडवून आणणे ', ' फारकत्या करणं ', ' मूतायला फूरसत नसणे ', ' हाल्याने दूध देणे ', 'खानी तशी बानी अन् व्हशील कोणावाणी ? ', ' 'हागणारानं लाजावं नाहीतर बघणारानं', 'फुकायला सोडलेल्या गाढवासारखी गत होणे ', ' आला ताप त तू महाबाप, गेला ताप तु तुहा बापाचा बाप ', ' पखालीची रांडवबाई होणे.' या पखालमधील म्हणी-वाक्यप्रचार व बोलीच्या योजनेविषयी प्रा.कृष्णा चौधरी लिहितात,"ग्रामीण वऱ्हाडी बोलीचा,अर्थपूर्ण वाक्यप्रचार व लोकजीवनातील म्हणीचा औचित्यपूर्ण उपयोग केल्यामुळे या कादंबरीच्या कथानकाला नवेच परिमान प्राप्त झाले आहे."[७]

यापद्धतीने या कादंबरीतून प्रतिमा,उपमा,सुभाषित म्हणी व वाक्यप्रचार यांचा वापर योग्य ठिकाणी करून कथानकाला आशयधन बनविले आहे. यादृष्टीने यांना या दोन्ही कादंबऱ्यात अनन्यसाधारण महत्त्व आहे.

४. या कादंबऱ्यातील कवितेचा वापर

कादंबरीच्या भाषाशैलीत काव्यात्मक योजनेलाही तेवढेच महत्त्वाचे स्थान असते.कवितेच्या माध्यमातून कादंबरीच्या आशयाला बळकटी मिळत असते. थोड्या शब्दातून व्यापक अर्थ सांगून लेखक कादंबरीतील कथानकाला गती देत असतो.'पखाल' या कादंबरीत बाबाराव मुसळे यांनी ठिकठिकाणी कवितेचा वापर करून कादंबरीतील भाषाशैलीला समृद्धता

आणलेली आहे. गावात नळयोजना आल्यानंतर पुंजा मानसिकतेने घायाळ झालेला आहे. अशा अवस्थेत एके दिवसी पोरीच्या पोरांच नाव ठेवण्याच्या समारंभाच्यावेळी

"चाऊ म्याऊ,घुगऱ्या खाऊ,
पखालीच पाणी पेऊ
बाळराजाले खेळाय नेऊ
कुर्रऽऽ र्र ऽ ऽ ऽ.,"(पृ.१३१)

हे गाणे ऐकून तो हे गाणं बदलायला हवे. तो बदल करीत असताना 'पखालीऐवजी नळयोजनेचं पाणी' असा बदल करून गाणे म्हणायला हवे असा विचार करतो.

"कमानी दरूजा ऽऽ पाणी भरे गिरीजा",(पृ.१२७)

"तुका म्हणे घ्याला, पाणी भरता भरता मेला",(पृ.१५०)

"आली आली रे दिवाळी
ढोरक्या कर रे ढेंडरवाळी
दिवा कर रे भाताचा
चौक भर रे मोत्याचा ",(पृ.१२३)

"दन् दन् दिवाळी, गाई म्हशी ओवाळी
गाई, म्हशी कोणाच्या, राम लक्ष्मीमनाच्या
राम-लक्षीमन कोणाचे,
भरत शत्रुघनाचे",(पृ.१२४)

"इडा -पिडा टळो,बळीचं राज्य येवो
कुपी काटी कुपी झडो, गाई-म्हशीनं वाडा भरो
गोचीड झडो,गोमाशी झडो,
सोन्या रूप्यानं वाडा भरो,
घरची धनी मौजा करो ", (पृ.१२४)

"माळणी माळणी फुलं दे,
खालचे खालचे वेचून ने
तेलनी तेलनी तेल दे

खालचं खालचं भरून ने", (पृ.१२७)

"सासुजी पोट दुखते ऽऽ

कुठशी, बोबींच्या देठाशी ऽऽऽ", (पृ.१३७)

"झाडावरची व्हलगी घुमतच होती,

सासुजी पोट दुखतेऽऽ

कुठंशी,बोबींच्या देठाशी", (पृ.१३७)

अशा पंक्तीतून व लोकगीतातून कादंबरीचे सार सांगितले आहे.कादंबरीची अखेरही कवितेच्या पंक्तीने झालेली दिसून येते. सर्व कोळी कुटुंब नळयोजनेच्या आगमनाने पाणी वाढण्याचा धंदा बंद होऊन,गाव सोडून चालले आहे. अशावेळी पुंजाचा नातू राजू हा मिणमिणत्या मेणबत्ती समोर कविता म्हणतो,

"मला वाटते बसुनी विमानी

अफाट गगनी हिंडावे

किंवा सुंदर नौकेमधून

समुद्रातून भटकावे."(पृ.१६८)

अशा कवितेचा वापर करून बाबराव मुसळेंनी कादंबरीच्या भाषेला वेगळाच साज चढविला आहे.एकूनच कादंबरीची भाषाशैली वैशिष्ठ्यपूर्ण झालेली आहे.

५. 'माणदेशी 'आणि 'वऱ्हाडी'प्रांतातील ग्रामीण बोली

'झावळं' कादंबरीत माणदेशी प्रांताचे तर 'पखाल' मध्ये 'वऱ्हाड प्रांताचे चित्रण आलेले आहे. या दोन्ही कादंबऱ्याचे संपूर्ण कथानक आपआपल्या प्रांतात घडलेले असल्यामुळे तेथील बोलीभाषाही तेवढ्याच समर्थपणे पात्रांच्या तोंडून व्यक्त करण्यात प्रस्तुत लेखकांना यश आलेले आहे.माणदेशी आणि वऱ्हाडी ग्रामीण बोलीचा भाषाशैलीच्या दृष्टीकोनातून विचार करताना प्रथम महाराष्ट्रातील विविध

प्रांतात माणदेशी व वऱ्हाड या प्रांताचे स्थान,तेथील पात्रांच्या तोंडची बोलीभाषा व या अनुषंगाने येणारी म्हणी-वाक्यप्रचार, सुभाषित यांचा वापर या गोष्टी लक्षात घ्याव्या लागतील.

महाराष्ट्राचे भौगोलिकदृष्ट्या प्रमुख चार विभाग पडतात.

१. विदर्भ
३. पश्चिम महाराष्ट्र
२. मराठवाडा
४ कोकण (गोव्यासह)

या चारही विभागाचे प्रादेशिक ग्रामीण व दलित जीवन हे भिन्न स्वरूपाचेआहे. येथील भौगोलिक,सामाजिक, आर्थिक,सांस्कृतिक,राजकीय व भौगोलिक वैशिष्ठ्ये ही पूर्णपणे वेगवेगळी आहेत. याप्रमाणेच बोलीभाषाही स्वत:च्या प्रांताचे वेगळेपणही दाखवितात. 'झावळं' ही उत्तम बंडू तुपे यांची माणदेशी प्रांतातील कादंबरी आहे. माणदेश प्रांत हा पश्चिम महाराष्ट्रातील एक उपप्रांत असून येथे अनियमित पाऊस पडतो,कोरडवाहू शेती आहे,लोक उपजिविकेसाठी भटकंती करीत असतात अशा भौगोलिक वैशिष्ठ्यातील नदीवर मासेमारी करून आपल्या कुटुंबाचा परंपरागत उदरनिर्वाह करणाऱ्या ' मासेमारी कोळी' या जमातीवर ही कादंबरी लिहिली आहे. यामध्ये येणारी बोलीभाषा ही नदीवर मासेमारी करणे, बाजाराला विक्री करणे, गावातील राजकारण-भाऊबंदकी,कोळी जनजीवन या मुद्द्याच्या संबंधित येते. माणदेशी प्रांतातील एका गावामध्ये हे कथानक घडित असून एका काशिनाथ व सोनी या पतीपत्नींची एका वर्षाची दैनंदिनी या कादंबरीत चित्रीत करण्यात आलेली आहे.

'पखाल' कादंबरीत चित्रीत केलेले पखाली कोळी समाजाचे जनजीवन हे वऱ्हाड प्रांतातील एका गावामध्ये घडले आहे. या गावातील पुंजा व त्याचे कोळी कुटुंब नळयोजना आल्याने कसे हतबल होते आणि गाव सोडून जाते याबाबतची चर्चा करण्यात आलेली आहे.या कादंबरीतपखालीचा व्यवसाय,नदी,बलुतं, गावातीलराजकारण,कोळी जमातीची यात्रा,विविध सुविधा आदी

मुद्यांच्या अनुषंगाने बोलीभाषा व्यक्त झालेली आहे. या माणदेशी व वऱ्हाडी प्रांतातील ग्रामीण बोलीचा अभ्यास करणे हा या प्रबंधिकेचा प्रधान हेतू असल्याने या कादंबऱ्यात आलेल्या बोलीभाषाचा विचार करूया. 'झावळं' या कादंबरीत 'माणदेशी ग्रामीण बोली,' उत्तम तुपेंनी पुढीलप्रमाणे चित्रीत केलेली आहे.

'झावळं' या कादंबरीमध्ये माणदेशी ग्रामीण भागाचे चित्रण आलेले असल्याने ग्रामीण भागाला साजेशी अशी ग्रामीण माणदेशी बोलीभाषा लेखकाने वापरली आहे. माणदेशी परिसरातील ही बोलीभाषा त्या त्या पात्रांच्या तोंडूनही अगदी शोभून दिसते. पात्रांना उठावदारपणा प्राप्त करून देते उदाहरणार्थ–

काशिनाथ व सोनी ही पतीपत्नी माशाच्या विक्रीसाठी बाजाराला गेले असता तिथे मुलाणी मासे घेण्यासाठी येतो त्यावेळी दोघांमध्ये चाललेला संवाद हा पश्चिम महाराष्ट्रातील माणदेशी बोलीची ओळख करून देतो.

"ए, मुलाण्या हे मासं हायतं,बोकडाची सागुती नव्हं ,तवा चिवडत बसायला,बोल किती पायजीत?"

"मेरेकू दो किलो पायजे"

"काढ सोळा रूपये"

"माजीकडं आठचं रूपये हायती. आठ रूपये उधार ठिवणार का"?

"न्हाय,बाबा,तू पैशाला लई चिकट.तूझ्या हातातनं पैसा सुटत न्हाय.दिवाळीची उधारी शिमग्याला देणारा तू"

"दूसरेकू कैसा उधार दिला

"ती माजी मर्जी, तुला दियाचं न्हाय."

"मत दो, देखूंगा,वख्त येतो कुणावर बी"

"आ ऽ रं जा! आसं लई आलं आन गेलंबी देखनेवालं"(पृ.८)

मासेमारीसाठी निघालेल्या काशिनाथला पत्नी सोनी अमावस्येचे व दारू प्याल्याचे कारण सांगून अडवून ठेवते. यावेळी दोघां पती–

पत्नीत झालेलं बोलनं याप्रमाणे.

"ए, सांगितलं हुतं न्हवं,लई पिऊ नको?"

"सोने,लई न्हाय,दोघात एक बाटली घेतली, ग, पर कडक लागली."

"मी म्हणती, दारू न्हाय पेल्ली, तर काय हुतंय?"

"सोने, तुला काय ? आमाल्ला दिवसभर चिखला-पाण्यात जिव भिजवावा लागतू. गार पाण्यात राहून रगत थंड झालंय. त्याला वाईच्य तर उनउने करायला पायजी!"

"मग दारू पिऊन काय जीव मोठा हुतेय?"

"सोने,निदान तेवढेचं सुख तरी वाटतयं, पोटात दारू गेली, की आपून आपलं नसतू आटप,उगं लांबड लावू नंगस्त. मला गेलं पायजे वढ्याला"

"ए,आसं नशापाणी करून जाऊ नुको त्यात आज आमुशाची रात,भुतंखेत निघत्यात"

"सोने, भुताला भूत काय करतं ? असे भुताला भिऊन आपलं पोटं कसं भरायचं?"

"ए,रातसं पाण्यात उतरू नुको, माझी शपथ हाये बघ" (पृ.१८)

'झावळं' या कादंबरीप्रमाणेच 'पखाल' मधून बाबराव मुसळे यांनी वऱ्हाड प्रांतातील बोलीचा संवादासाठी वापर केलेला आहे.वऱ्हाडी बोली ही मराठीची एक प्रमुख बोली असून तिथे संदर्भ या कादंबरीत आलेले आहेत. पुंजा आणि रघ्या यांच्यात नळयोजनेच्या वर्गणीतून भांडण होऊन एकमेकांच्यावर तुटून पडतात त्यावेळच्या प्रसंगातील संवादात वऱ्हाडी बोलीभाषेचा प्रत्यय येतो.

"सोड त्याले, त्याच्यावर हात टाकायची ही वेळ नाही"

"नाही ह्याले,एकदा हिसका दाखवूच द्या ,ह्यो कोणाच्या भरवशावर उड्या मारायला तेपाहूचा!"

"हिसकं दाखवणाराले मायचं दूध प्या लागते"

"पुंजा,आता तुहं,बी तोंड आवर!"

"माघ्या मायचं दूध कसं हाये ते दावीतच तुले तरचं नावाचा रघ्या मन"

"आता बस कर न"

"भांडण सोडा वगर्णीच काय ते सांगा"

"कहाची वर्गणी"

"नळयोजनेची"

"माह्या काय फायद्याची 'हाये तुमची नळयोजना?"

"तुम्हच्या एकट्याची नसल,गावच्या फायद्याची नाही का ?"

"मग गाववाल्यालेच मागां वर्गणी,मले कहाले मागला ?"

"बरं,बर जाय तूला वाटंनं" (पृ.२४)

"अव् गावात नळ न येऊ हे मग पाहाय घरात जागजागी नळ घेतो. मग तुझ्या नवऱ्याच तोंड पाहायची गरज पडणार नाही पण ह्या योजनेचे मऊ काऊन लवकर जायेना देव जाणे.मले तर वाटते,आजच नळ यावे." (प्रकरण १२१वे) या भाषेविषयी प्रा.कृष्णकांत पराते आपले मत नोंदवितात की,

"ही कादंबरी परिसराच्या दृष्टीने,ग्रामीण जाणिवेच्या दृष्टीने इतकेच नव्हे तर भाषेच्या बाबतीतही ग्रामीणतेतच बंदिस्त आहे. निवेदनाची भाषा आणि संवादाची भाषा यांच्यामध्ये स्पष्ट अशी मर्यादारेषा तर ओढता येतच नाही पण चिंतनाची पातळी व भाषाही ग्रामीण संवेदनेशी फारकत घ्यायला तयार नाही"[६]

अशाप्रकारच्या ग्रामीण माणदेशी आणि वऱ्हाडी बोलीचा प्रत्यय 'झावळं' व 'पखाल' या कादंबरीमध्ये जागोजागी येतो. विशेषत: पात्रांच्या तोंडीच ही बोली जास्त प्रमाणात येऊन जाते. या बोलीमुळे पात्रामध्ये अधिकाधिक जिवंतपणा येत गेला आहे. या बोलीभाषेचा वापर उत्तम तुपे आणि बाबाराव मुसळे यांनी या कादंबरीत केला आहे.

६. या कादंबरीचे भाषाविशेष

साहित्यामध्ये भाषेला अनन्यसाधारण महत्त्व असते. भाषेच्या माध्यमातून लेखक आपल्या मनातील विचार भावना व्यक्त करीत

असतो.परंतु कोणत्याही ललित साहित्याची भाषा कशी असावी याबाबत निश्चित आग्रह धरता येत नाही. किंबहुना असा आग्रह धरणे हे कलाकृतीच्या दृष्टिने जाचक ठरू शकेल परंतु या भाषा-नुभवाचे लेखक प्रकटीकरण करीत असतो त्या भावानुभवाशी इमान राखणारी भाषा हवी. कलाकृतीत प्रकट होणाऱ्या अनुभवामध्ये वेगळेपणा असल्यामुळे लेखकाच्या अनुभवाच्या मागणीनुसार भाषा वापरीत असतो. आणि हेच त्या भाषेचे वैशिष्ठ्य ठरत असते. लेखकाने वापरलेल्या भाषाशैलीवर त्याच्या व्यक्तिमत्त्वाची छाप कळत न कळत उमटत असते.म्हणजेच एखाद्या कलाकृतीतील भाषा ही लेखकाच्या स्वभावाचाच एक भाग म्हटले तर वावगे ठरू नये. त्यातून तो सुंदर भाषाशैलीला जन्म देत असतो. जर भाषाशैली सुंदर असेल तर तो अनुभव वाचकापर्यंत चांगल्याप्रकारे जाऊन पोहचतो. भाषेच्या माध्यम आणि कार्याविषयी बापट व गोडबोले म्हणतात त्याप्रमाणे " विचार व भावना शब्दांच्याद्वारे व्यक्त करण्याचे माध्यम हे भाषेचे कार्य असते. "[७]

उत्तम बंडू तुपे यांनी लिहिलेल्या 'झावळं' या कादंबरीतील भाषाविशेषाचा विचार करताना प्रथम हे नमुद करणे आवश्यक आहे की, त्यांनी या कादंबरीत निवेदनासाठी ग्रामीण पश्चिम महाराष्ट्रीय माणदेशी प्रांतातील बोलीभाषेचा वापर केलेला आहे. त्यामुळे तो परिसर, तेथील व्यक्ती जिवंतपणे साकार होण्यासाठी मदत झाली आहे. मधून-अधून संघर्षात्मक, शिव्या आणि प्रश्नार्थक शैलीचाही वापर केल्याने कादंबरीला अस्सलपणा प्राप्त होतो. लेखकाची निवेदने ही पुणेरी व सातारी अशा मिश्रप्रमाण भाषेत कथन केली आहेत. कादंबरीतील शब्द, वाक्य व परिच्छेदाच्या रचनेत कोळी समाजजीवनाचे चांगले संदर्भ तुपे यांनी दिले आहेत. अधून-मधून प्रतिमा, प्रतिके, सुभाषिते, म्हणी व वाक्यप्रचार यांचा सूचकपणे वापर केलेला आहे. एकूणच माणदेशी बोली व संवादातून व वैशिष्ठ्यपूर्ण झालेली अशी आगळी-वेगळी कादंबरी आहे.

'पखाल' या कादंबऱ्यातील भाषाविशेषांचा विचार

करताना पहिला भाषाविशेष असा की, या कादंबरीत बाबाराव मुसळे यांनी वऱ्हाड प्रांतातील वऱ्हाडी बोलीचा संवादासाठी वापर केलेला आहे. प्रत्येक पात्रांच्या तोंडून ही बोलीभाषा व्यक्त होत असल्यामुळे त्याच्या व्यक्तिमत्त्वाला जिवंतपणा प्राप्त होतो. शब्द, वाक्य व परिच्छेदाच्या वापरामध्ये पानभरे कोळी जीवन चांगल्या अर्थाने चित्रीत करण्यात लेखकाला यश मिळाले आहे. या कादंबरीमधून पुंजाची शोकांतिका कथित करताना तशी वाक्ये, म्हणी-वाक्यप्रचार, सुभाषिते वापरून थोडक्यात आशय व्यापक केला आहे. तसेच प्रतिमा, उपमा आणि कवितेचा वापर यामुळे वऱ्हाडी बोली सूचकपणे व्यक्त होते. यासंबंधी किशोर सानप लिहीतात,

" मुसळ्यांची शैली परंपरागत असली तरी अनेकदा ती वास्तवाचे टोक गाठतानाही दिसते. परंपरागत आणि वास्तव शैलाचे सुरेख मिश्रण पखालमध्ये आढळते. पखालमध्ये अनेक वाक्यप्रचार, म्हणी, प्राक्कथा, बोलीची रूपे शैलीचे सामान्य रूप दर्शवितात. " [८]

याचबरोबर मुसळे यांनी निवेदनासाठी मराठी प्रमाणभाषेचा वापर केला असून त्यामुळे कादंबरीच्या कथानकाला गती मिळते. एकूणच वऱ्हाडी बोलीभाषा ही संवादातून वैशिष्ठ्यपूर्णरित्या व्यक्त केल्यामुळेच प्रस्तुत कादंबरी भाषाशैलीच्या दृष्टिने आगळी-वेगळी ठरली आहे.

७.समारोप

'झावळं' आणि 'पखाल' या कादंबऱ्याच्या भाषाविशेषाचा विचार करताना या दोन्ही कादंबऱ्या त्या दृष्टिने वेगळेपण सिद्ध करतात. 'झावळं या कादंबरीत माणदेशी प्रांतातील बोलीभाषेचा तर पखालमध्ये वऱ्हाडी बोलीभाषेचे चित्रण करण्यात आलेले आहे. या कादंबऱ्यातून शब्द, वाक्य, परिच्छेद, प्रतिमा, उपमा, सुभाषित, कवितेचा वापर, म्हणी, वाक्यप्रचार यांचा वापर नेमकेपणाने केल्यामुळे कादंबऱ्या भाषाशैलीच्या दृष्टिने महत्त्वपूर्ण वेगळ्या ठरल्या आहेत.

संदर्भ ग्रंथ-सूची

१. भालचंद्र नेमाडे,'साहित्याची भाषा,' साकेत प्रकाशन, औरंगाबाद,प्रथमावृत्ती१९८७ ,(पृ.२२)

२. रंगनाथ पठारे, 'सत्वाची भाषा'श्रीराम प्रकाशन ,अहमदनगर, प्रथमावृत्ती १९९७, पृ. २९९

३ .रूचिरा भाटकर, 'दै. सामना' ३१ मार्च १९९६ (मुंबई आवृत्ती)

४ भालचंद्र नेमाडे,'साहित्याची भाषा,' साकेत प्रकाशन, औरंगाबाद,प्रथमावृत्ती १९८७ .(पृ.३०)

५ प्रा.कृष्णा चौधरी, 'दै लोकमत' (औरंगाबाद आवृत्ती) जून १९९६

६ प्रा. कृष्णकांत पराते, 'अक्षरवैदर्भी' एप्रिल-मे-जून १९९९, पृ. ६७

७. बापट व गोडबोले, 'मराठी कादंबरी तंत्र आणि विकास' , व्हीनस प्रकाशन, पुणे,तृतिय आवृत्ती १९७३, पृ. १३७

८ किशोर सानप, 'अक्षरवैदर्भी' ऑगष्ट १९९६, पृ. ५२